# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २९.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २८/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १९५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,४०,६४०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २८/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण १३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ४६.६२ लिटर दारू असा एकुण २९,०९०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. २८/१०/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे बासंबा व कुरूंदा या ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण २८५०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—**

दिनांक 28/10/2022 रोजी फिर्यादी किरण विनायक चव्हाण व्य. डॉक्टर रा बेरूळा ह मु षिक्षक कॉलनी जवळा बाजार ता औंढा ना यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. 27.10.2022 रोजी 22.00 वा ते दि 28.10.22 रोजीचे सकाळी 08.00 वा चे दरम्यान यातील फिर्यादीने त्यांचे घरमालक यांचे षिक्षक कॉलनी जवळा बाजार येथील घरासमोर लावलेली मोसा हि कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.